# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे.

## वार्षिक अहवाल २०२५

## अध्यक्षीय मनोगत

सन्माननिय,

सभासद बंधू आणि भगिनींनो,

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे चा आर्थिक वर्ष २०२४-२५ कालावधी चा चौथा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करीत आहे.

संस्थेच्या स्थापनेपासून आरोग्य क्षेत्रात सभासदांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहिला आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्रात लोकांमध्ये आरोग्यसबंधी जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. संस्थेचे विद्यानगर येथे जानेवारी २०२२ पासून पुणे इंटरनॅशनल स्कूल, येथे ओपीडीची सुरुवात झाली आहे. सभोवतालच्या परिसरातील लोकांना अल्पदरात आरोग्य सेवा देण्याचे काम करीत होती. परंतु संस्थेच्या सभासदांकडून आणि अन्य लोकांकडून अपेक्षित प्रतिसाद दिसून येत नसल्यामुळे तसेच दापोडी येथील रुग्णालय कार्यान्वित झाल्याने तात्पुरती ओपीडीची सेवा १ जानेवारी २०२४ पासून स्थगित केले आहे. भाडेतत्त्वावर इमारत घेऊन संस्थेचे दापोडी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल जून २०२४ पासून सुरू केले असून ३० बेडसह सर्व सुखसोयुक्त सुरू झाले. परंतु सभासदांचा या रुग्णालयातून

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

## वार्षिक अहवाल २०२५

आरोग्यसेवा घेण्यास सहभाग दिसून आलेला नाही. सदर दापोडी रुग्णालयाची फक्त बिगर सभासदांनीच लाभ घेतला आहे.

सभासदांना आरोग्य सेवा देण्यासाठी स्वतःच्या इमारतीमध्ये रुग्णालय सुरु करण्याचे प्रयत्न संचालक मंडळ करत आहेत. जागेसाठीचे प्रस्ताव शासकीय विभागाकडे तसेच पुणे महानगर पालिका तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना सादर करण्यात आले. परंतु, जागा संपादित करण्यात अजूनही यश मिळाले नाही.

येरवडा येथील जवळपास ६४०० स्क्वेअर फुट भूखंडासाठी संस्थेने म्हाडाचे निविदेत भाग घेतला आणि निविदेत संस्थेची सर्वोच्च बोली असल्याने भूखंड मिळाले आहे. अजूनही रीतसर भूखंड आवंटनाचे पत्र म्हाडा कडून मिळाले नाही संचालक मंडळ त्यासाठी पाठपुरावा करीत आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेचे दैनंदिन कामकाज तसेच नियोजन इ. साठी संचालक मंडळ कार्य करीत आहे. महाराष्ट्र राज्याच्या सहकार निवडणूक प्राधिकरणाकडून संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून १५ संचालकांची नवनियुक्त संचालक मंडळाची ९ जुलै २०२५ पासून पुढील पाच वर्षासाठी २०२५-३० या कालावधीसाठी निवड झाली आहे. बिनविरोध निवडणूक झाल्याने संस्थेचा जवळपास रुपये १० लाख खर्च वाचला आहे. यासाठी सर्व सभासदांचे निवडणूक प्रक्रियेतील सहभागाबद्दल आभार मानतो.

आरोग्य क्षेत्रात लोकाना अल्पदरात आरोग्य सेवा देण्याच्या उपक्रमाला लोकांचा सहभाग आणि योगदान अपेक्षित आहे.

आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५अखेर सस्थेने केलेल्या प्रगतीची तसेच आर्थिक परिस्थिती आणि भविष्यातील वाटचाल इत्यादीची माहिती आपल्यासमोर सादर करीत आहे.

BODHISATVA

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

**वार्षिक अहवाल २०२५**

## १.सभासदः

३१ मार्च २०२४ अखेर संस्थेचे १८३९ एकूण सभासद असून सभासदांनी घेतलेल्या भागांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| सभासदांनी घेतलेल्या भागाची संख्या | एकूण सभासद | पैकी २०२४-२५ मध्ये झालेल्या नवीन सभासद |
|---|---|---|
| एक | ११०७ | ६७ |
| दोन | ३५८ | ३७ |
| तीन | २५ | ६ |
| चार | ४४२ | ० |
| पाच आणि पाच पेक्षा जास्त | ३९ | २२ |
| एकूण | १९७१ | १३२ |

BODHISATVA

संस्थेच्या सर्व सभासदांचे विशेष आभार आणि अभिनंदन.

संस्थेच्या २२ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या अधिमंडळाच्या वार्षिक सभेत संस्थेचा निधी वाढवण्यासाठी ठराव क्रमांक ३ प्रत्येक सभासदांनी अधिकचा एक शेअर घ्यावा तसेच एक नवीन सभासद करून घ्यावे असा ठराव पारित करण्यात आला होता. परंतु आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेच्या सभासदांकडून या ठरावाची अंमलबजावणीच झाली नाही व फक्त केवळ १३२ नवीन सभासद झालेले आहेत. सर्वसाधारण सभेचा निर्णयानुसार सभासदांनी एक वाढीव शेअर्स घेणे व एक नवीन सभासद करणेस तसेच उपविधीतील तरतुदीनुसार रु. २०००/- प्रति वर्ष वार्षिक वर्गणी सभासदांकडून प्राप्त झाले नाहीत. सभासदांना वारंवार विनंती करण्यात आली परतु अपेक्षित प्रतिसादच मिळाला नाही.

`

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

वार्षिक अहवाल २०२५

## 2. भागभांडवल :-

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. ५,००,००,०००/- (रु. पाच कोटी) असून प्रत्येक शेअरची किंमत रु. ५,०००/-आहे. ३१ मार्च २०२५ रोजी संस्थेचे वसूल भाग भांडवल रु. १,९५,२०,०००/-आहे. संस्थेच्या भागभांडवलात वार्षिक सभेमध्ये झालेल्या ठरावाची अंमलबजावणी न झाल्याने विशेष वाढ झालेली नाही.

सर्व सभासदांना नम्र विनंती आहे की, आपल्या आर्थिक क्षमतेनुसार रु. ५,००,०००/- पर्यंत भाग घेऊन संस्थेचे भाग भांडवल उभे करण्यासाठी सहकार्य करावे, तसेच वार्षिक वर्गणी भरणा करावी. जेणेकरून संस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी सभासदाच्या योगदानातून, सहयोगातून आणि सहकार्यातून उभा करता येईल.

## ३. निशुल्क आरोग्य शिबीरः-

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे संचलित दापोडी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल मध्ये २४ मे २०२४ ते ३० मे २०२४ पर्यंत निशुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षात आपण दापोडी हॉस्पिटल करिता वेगवेगळ्या कन्सल्टंट मार्फत तसेच सबर्बन डायग्नोसिक सेंटर,अन्नपूर्णा चॅरिटेबल ट्रस्ट सोबत टायअप केलेले आहे. तसेच सीओईपी मध्ये एक शिबिर आयोजित केले होते त्यातून रक्कम रुपये १५,६५८/- प्राप्त झाले.

BODHISATVA

## ४. संचालक मंडळ आणि संचालक मंडळाच्या बैठका :-

नवनिर्वाचित संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ ०९ जुलै २०२५ पासून कार्यरत असून विभिन्न क्षेत्रातील अनुभवी १५ सदस्यांचे संचालक मंडळ संस्थेचे दैनंदिन व्यवहार आणि कामकाज करीत आहे. नवनियुक्त संचालकातून अध्यक्ष म्हणून डॉ. मोरेश्वर सुखदेवे तसेच उपाध्यक्ष म्हणून प्रा. गौतम मगरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

संचालक मंडळातील निवृत्त संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. विजयकुमार माने, डॉ. बी. डी. बांडे, डॉ. संजय खरात आणि श्री. चंद्रकांत शिंदे यांनी संस्थेच्या कामकाजात योगदान दिले. त्याबद्दल सर्वांचे विशेष आभार मानतो. अहवाल कालावधीत एकूण ११ संचालक मंडळाच्या बैठका घेण्यात आल्या.

## ५. संस्थेची आर्थिक स्थिती :-

३१ मार्च २०२५ अखेर सस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण मे. माधव बो-हाडे आणि कंपनी यांनी केले आहे. ३१ मार्च मध्ये संपलेल्या वर्षाचा नफा तोटा पत्रक तसेच ३१ मार्च २०२५ चे ताळेबंद सोबत जोडलेले आहेत. वरील पत्रकावरुन संस्थेची खालील प्रमाणे आर्थिक परिस्थिती दिसून येते.

अ)संस्थेचे एकूण वसूल भागभांडवल रु. १,९५,२०,०००/-आहे.

ब) वैधानिक लेखापरीक्षकांच्या रिपोर्टनुसार संस्थेला ३१ मार्च २०२५ ला संपलेल्या कालावधीत एकुण तोटा रु १९,२६,०२५.०५/- दिसून येत आहे. सदर तोटा दापोडी येथील रुग्णालयास अपेक्षित प्रतिसाद सभासद व बिगर सभासदांकडून न मिळाल्याने झाला आहे.

क) अखेर संस्थेच्या निधीचा उपयोग गरजेनुसार करण्यात येत आहे व शिल्लक निधीची बँकेत गुंतवणूक केली जात आहे. बँकांमध्ये केलेली गुंतवणूक खालील प्रमाणे आहे.

BODHISATVA

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

वार्षिक अहवाल २०२५

## १. मुदत ठेव :

| बँकेचे नाव | मुदत ठेव |
|---|---|
| पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | २६,३९,६३३.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ५५,३८,६२४.०० |
| इंडियन बँक | २७,९५,२०९.०० |
| एचडीएफसी बँक | २९,४५,७२७.२० |
| येस बँक | ३१,०२,६९२.७० |
| एकूण | १,७०,२१,८८५.९० |

## २. चालू खाते

| बँकेचे नाव | चालू खाते |
|---|---|
| पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ३,६२,३५५.७८ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ४,९३,५१७.९१ |
| इंडियन बँक | ५,१७१.३५ |
| एचडीएफसी बँक | ५९,०३८.५५ |
| येस बँक | १,३९,७७६.३१ |
| एकूण | १०,५९,८५९.९० |

BODHISATTVA

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

**वार्षिक अहवाल २०२५**

ड) ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात वेगवेगळ्या दानशूर व्यक्तीकडून रु. २,४३,६०७.०० /- दान प्राप्त झाले.

| अ.क्र | नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. नित्यानंद देशपांडे | १,००१/- |
| २ | डॉ. आनंद जोगदंड | २०,०००/- |
| ३ | डॉ. दिनेश चिरला | ५०,०००/- |
| ४ | डॉ. पी. टी. गायकवाड | २०,०००/- |
| ५ | डॉ. बी.पी. गायकवाड | २०,०००/- |
| ६ | डॉ. सुरेश हनमंते | २०,०००/- |
| ७ | डॉ. उज्वला बेंडे | २०,०००/- |
| ८ | श्री. अरुण डुबे | ५,०००/- |
| ९ | इंजि. अनिल कुमार सूर्यवंशी | २०,०००/- |
| १० | श्री. संजय फुले | १,०५१/- |
| ११ | श्री. छगन गंडाळ | १,०००/- |
| १२ | श्री. पेशव कवाडे | १५,०००/- |
| १३ | श्री. सुरेश कोते | २०,०००/- |
| १४ | श्रीमती रंजना कांबळे | २५,०००/- |
| १५ | सौ. सरोज राहुल सोनावणे | ५,५५५/- |
| १६ | डॉ.मोरेश्वर सुखदेवे (रक्कम १ एप्रिल २०२५ ला बँक खात्यात जमा झाली.) | २०,०००/- |

BODHISATTVA

धम्मदाना करिता दानकर्त्यांचे संचालक मंडळाकडून अभिनंदन करण्यात येत आहे. सर्व सन्मा. सभासद आणि हितचिंतकांना विनंती करण्यात येते की, संस्थेचा उद्देशपूर्तीसाठी जास्तीत जास्त धम्मदान देऊन सहकार्य करावे.

## ७.संस्थेची पुढची वाटचाल:-

सहकारी क्षेत्रात स्वतचे सुसज्ज रुग्णालय असावे याद्दष्टिकोनातून संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. स्वतची जागा घेऊन त्यावर सुसज्ज असे रुग्णालय उभे करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. अहवाल कालावधीत संस्थेने जागेसाठी पुणे जिल्हा अधिकारी, आयुक्त पुणे महानगरपालिका, आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना जागा मिळणे बद्दलचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचेकडे आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. पण अजून आपल्याला यश मिळालेले नाही.

शासकीय जागा उपलब्ध झाल्यास किंवा जागा विकत घेऊन आपली स्वतची इमारत उभी करून त्यात सुसज्ज असे रुग्णालय स्थापन करण्याचा आपला मानस आहे. वेगवेगळ्या शासकीय विभाग आणि व्यक्तीबरोबर संचालक मंडळ संपर्कात असून जागा उपलब्ध करून देण्यासाठी विनंती करत आहे.

दिनाक ७ मार्च, २०२४ रोजी म्हाडाची जागेसंबंधी जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यानुषंगाने संस्थेने येरवडा येथील दोन प्लॉट (Survey No. 191/A plot 14 area 432 sq. mtr, and survey no. 191/A Yerwada plot 16 area 595 sq.mtr.) साठी निविदा भरली होती. दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी म्हाडानी आर्थिक बीड उघडण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या संस्थेला. 595, वर्ग मीटर (जवळ, 6400 वर्ग फूट) चा येरवडा येथील ओपन प्लॉटसाठी आपली निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदर जागेसाठी भरलेल्या निविदेनुसार संस्थेला रु २,१८,५४,८२६/-ची बीड स्वीकारण्यात आली आहे. म्हाडा कडून भूखंड आवंटन चे पत्र प्राप्त झाले नाही त्यासंबंधी संचालक मंडळ पाठपुरावा करीत आहे. संस्थेकडे उपलब्ध निधी विचारात घेता जागेसाठी भरावयाची किंमत तसेच नोंदणी शुल्क इत्यादि. आणि

BODHISATVA

बांधकाम करण्यासाठी तातडीने निधी गोळा करण्याची गरज आहे. संस्थेच्या सर्व साधारण बैठकीत कमीत कमी रु. ५,००,००,०००/- भागभांडवलातून उभे करण्याचा मानस संचालक मंडळाने नमुद केला होता. भागभांडवलापोटी रु. पाच कोटी जमा करणे अशक्य नाही. यासाठी सर्व सभासदांचा आर्थिक योगदान आणि सहकार्य असणे गरजेचे आहे. मागील अधिमंडळाच्या सभेतील निर्णयाप्रमाणे सभासदांनी नव्याने किमान अजून एक शेअर्स घेणे व एक नवीन सभासद जोडणे असा ठराव पारित केला होता, तथापि संस्थेचे स्वतःचे हॉस्पिटल भविष्यात निर्माण होणे साठी मोठ्या प्रमाणात निधी उभारण्याची अत्यंत आवश्यकता असून सभासदांनी रुपये पाच लाखापर्यंत भाग धारण करणे, धम्मदान देणे व नवीन सभासद जोडणे अनिवार्य राहील. अन्यथा निधी अभावी स्वतःचे रुग्णालय उभारण्यास जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे.स्वतःचे रुग्णालय कमीत कमी कालावधी उभारण्यासाठी जास्तीत जास्त निधी गोळा करणे आवश्यक असल्याने सर्व संचालकांनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावाप्रमाणे किमान एक शेअर्स अधिकचा धारण करणे, एक नवीन सभासद जोडणे व धम्मदान करण्याचे आवाहन केलेले आहे, पण सभासदांकडून प्रतिसादच मिळाला नाही.

बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल १ २०२४ पासून दापोडी येथे कार्यरत आहे. दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल ३० बेडचे असून रुग्णालयात आय सी यू, ऑपरेशन थिएटर, इत्यादीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी लागणारा, डॉक्टर नर्सेस आणि अन्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हॉस्पिटल २४०० वर्गफुट असून भाडे तत्वावर, भाडे रु. १,१०,०००/-प्रती महिना वर घेण्यात आले आहे. इमारतीच्या मालकाला बिनव्याजी परत करावयाची ठेव रुपये १०,००,०००/-देण्यात आले आहे. भाडेकरार १ मे २०२४ पासून पाच वर्षाच्या कालावधीचा आहे. रुग्णालयात मेडिकल स्टोर्स चालिवण्यासाठी १२० वर्गफूट जागा श्री. सौरभ संपत पडवळ यांना रु. १८,००,०००/- बिनव्याजी ठेवी घेऊन देण्यात आली आहे. मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल साठी परवाना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून प्राप्त करण्यात आला. असून त्यापोटी रु. ४,७९,६०८/- फी भरावी

BODHISATVA

लागली आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत दापोडी हॉस्पिटलवर एकूण खर्च रु.४६,३७,४४५.४० झाला असून आणि उत्पन्न केवळ रु.८,९१,७४८.१४ आहे. आरोग्य सेवा देण्यासाठी सभासदांसाठी व्यवस्था केली आहे, पण सभासदांना आरोग्य सेवा घेण्यास सहभाग मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल चालवण्यावर होत असलेल्या खर्चासाठी संचालक मंडळाच्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे संस्थेचा निधी या रुग्णालयावर खर्च न करता संचालक मंडळातील प्रत्येक सदस्यांनी रुपये. १,००,०००/-अनामत रक्कम परत करण्याच्या अटीवर घेऊन रुग्णालयाचा खर्च भागविण्याचे  देण्याचे ठरविण्यात आले आहे. संचालक मंडळातील संचालकांनी रुपये १०,९५,०००/-चा अनामत निधी संस्थेकडे दिला आहे. तसेच श्री. पेशव कवाडे सभासदांनीही रुपये १ लाख अनामत दिली आहे.

BODHISATTVA

## ८. शेअर्स सर्टिफिकेटचे वाटप:-

सन्माननीय सभासदांनी घेतलेल्या शेअर्सचे शेअर्स सर्टिफिकेट तयार करण्यात आले आहे. अजूनही काही सभासदांनी त्याचे शेअर्स सर्टिफिकेट घेतले नाही. सभासदांना विनंती करण्यात येते की संस्थेच्या कार्यालयातूनशेअर्स सर्टिफिकेट घेण्यात यावे.

## ९. वैधानिक लेखापरीक्षण:-

आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण मे माधव बो-हाडे आणि कंपनी यांनी केले,असून लेखापरीक्षण अहवाल संस्थेत सादर केला आहे. मा. लेखापरीक्षक यांनी संस्थेस **ब** वर्ग दिला आहे.  मी संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने त्याचे आभार व्यक्त करतो.

`

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

वार्षिक अहवाल २०२५

## १०. आभार:-

संस्थेच्या वतीने. मा. आयुक्त सहकार, महाराष्ट्र राज्य, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, श्री नागनाथ कंजीरे उपनिबंधक शहर ३ पुणे तथा निवडणूक निर्णय अधिकारी पुणे, यांचे आभार मानतो. भाग भांडवल उभे करण्यासाठी सर्व स्तरातील व्यक्तीनी, विभिन्न विभागातील व्यक्तीने मोलाचे योगदान दिले आहे. सन्मानीय सभासदाचे, संस्थेच्या हितचिंतकांचे मी संचालक मंडळाच्या वतीने अभिनंदन करतो आणि आभार मानतो. पुढच्या वाटचालीसाठी आपल्या सगळ्यांचे योगदान आणि सहकार्याची अपेक्षा करतो, भविष्य काळात बोधिसत्व सहकारी रुग्णालय लोकांच्या आरोग्य गरजा पूर्ण करण्यासाठी अव्वल दर्जाची संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त करण्यासाठी शुभेच्छा देतो.

## ११. श्रद्धांजली :-

अहवाल कालावधीत निधन पावलेले संस्थेचे सभासद, त्यांचे कुटुंब तसेच संस्थेचे हितचिंतक, ज्ञात व अज्ञात व्यक्ती या सर्वांचा आणि कुटुंबियांच्या दुखात संस्था सहभागी होत असून संस्थेच्या वतीने मृत सभासदांच्या स्मृतीस भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

आपला

डॉ. मोरेश्वर सुखदेवे

अध्यक्ष

BODHISATVA